आर्मितेय-५-४/१

रजि.ए.डी

जा.नं.एसएसएस/वशी-अ.क/3735 /२०२२
दिनांकः-
22 DEC 2022

प्रति,
श्री चिंतामणी इंडस्ट्रीज, श्रीरामपुर
ए/१४६, एमआयडीसी, मु.पो. ता.श्रीरामपुर. पिन. ४१३७०९.
जि. अहमदनगर.
प्रो.प्रा. अतुल सुरजमल न्याती मो.नं.९८२२४०९६७२

**विषयः- निरूपयोगी भंगार साहित्याबाबत..**

संदर्भः- १) जा.नं.एसएसएस/वशी-अ.क/४७१७/२०२२ दि. ३१/०३/२०२२ रोजीचा आदेश.
२) दि.१३/०४/२०२२ रोजीचा श्री चिंतामणी इंडस्ट्रीज, श्रीरामपुर यांनी करुन दिलेला करारनामा.
३) आपला दि.०५/०७/२०२२ व दि. दि.१५/०९/२०२२ रोजीचे पत्र.
४) जा.नं.एसएसएस/वशी-अ.क/१६८०/२०२२, दि.२५/०७/२०२२ रोजीचे पत्र.
५) जा.नं.एसएसएस/वशी-अ.क/२२४२/२०२२, दि.०८/०९/२०२२ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भ क्रं. १ चे आदेशान्वये आपणांस, खालीलप्रमाणे संस्थानमधील विभागांकडील खालीलप्रमाणे निरुपयोगी भंगार साहित्य विक्री करणेकामी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी कार्यदेश देण्यात आलेला आहे.

| अ.नं. | साहित्याचे नाव | उच्चतम प्राप्त दर |
|---|---|---|
| ०१ | रिकामे तेलातूपाचे लहान/मोठे तोंडाचे चांगले डबे | ५०.०० प्रती नग |
| ०२ | रिकामे तेलातूपाचे लहान/मोठे तोंडाचे तोंड फुटलेले / चेपलेले/काळे पडलेले खराब डबे | ४५.०० प्रती नग |

उपरोक्त साहित्यांमधील रिकामे तेलातूपाचे लहान/मोठे तोंडाचे चांगले डबे व रिकामे तेलातूपाचे लहान/मोठे तोंडाचे तोंड फुटलेले / चेपलेले/काळे पडलेले खराब डबे उचलणेबाबत आपणांस वेळावेळी संस्थान दुरध्वनीवरुन तसेच संदर्भ क्रं. ४ व ५ चे पत्राने कळवूनही आपण सदरचे साहित्य उचलत नसल्याचे दिसुन येत आहे. याबाबत आपण दि. ०५/०७/२०२२ व दि.१५/०९/२०२२ रोजी संस्थानला दिलेल्या अर्जात सदर साहित्य उचलणेबाबत असमर्थता दर्शविली आहे.

सदरचे पत्रान्वये आपणास कळविणेत येते की, आपणास देणेत आलेल्या आदेशातील अट क्र. ४ व करारनाम्यातील अ.क्र. ६ अन्वये मध्ये नमूद केलेप्रमाणे "आपणांस मंजूर असलेले साहित्य आपण १५ दिवसांचे आंत वेळोवेळी तोंडी/दुरध्वनीवरुन तसेच लेखी पत्र कार्यालयामार्फत कळवूनही आपण साहित्य न उचलल्यास १६ व्या दिवसापासुन प्रति दिन रु.१०० (अ.रु. शंभर मात्र) दंड करण्यात येईल तसेच अशा साहित्यांची विल्हेवाट लावण्याचे अधिकार संस्थानला आहेत अशा साहित्यांची विल्हेवाट लावल्यास कमी जास्त रकमेच्या फरकाची रक्कम आपले डिपॉझिट मधुन वसूल करण्यात येईल. वेळोवेळी कळवुनही माल न उचलल्यास आपले संस्थानकडील जमा असलेले डिपॉझिट जप्त करुन आपले नाव संस्थानचे काळे यादीत टाकण्यात येईल, त्याबाबत आपली कुठलीही लेखी अगर तोंडी तक्रार ऐकून घेतली जाणार नाही /ग्राहय धरली जाणार नाही." अशी अट नमूद करण्यात आलेली आहे.

तथापी, संदर्भीय क्र.३ चे अर्जानुसार आपण मंजूर असलेले साहीत्य उचलणेस असमर्थ असल्याचे पत्र दिल्याने आपली संस्थानकडे जमा असलेली अनामत रक्कम रु.१५०००/- संस्थान खाती जमा करण्यात येत असून,आपले फर्मचे नाव पुढील तीन वर्षाकरिता संस्थानचे काळे यादीत समाविष्ठ करण्यात येत आहे. यापुढे आपणांस पुढील तीन वर्षाचे कालावधीत संस्थानचे कोणत्याही प्रकारच्या ई-निविदा व कोटेशन प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. याची नोंद घ्यावी.

(राहूल जाधव)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

१९/१२